# मोरपीस



मोर हा सुंदर पक्षी. तो इतका मनमोहक आणि आकर्षक की, मोर दिसल्यावर कोणी खुश होणार नाही असा माणूस विरळा. मोराला त्याचं जे सौंदर्य प्राप्त झालाय ते त्याच्या डोक्यावरील तुऱ्याने आणि त्याच्या मनमोहक पिसाऱ्याने.

मोर जितका आकर्षक तेवढी लांडोर नाही पण ह्या लांडोरीला आकर्षित करण्यासाठी मोर आपला मनमोहक पिसारा फुलवतो. असं म्हणतात, पावसाळ्याच्या सुरवातीला मोरांचा विणीचा हंगाम असतो. मोर, हा नर पक्षी त्या लांडोरीला आकर्षित करण्यासाठी त्याचा मनमोहक पिसारा फुलवतो. मोराचे ते मयूर नृत्य पावसाच्या आगमनाची वर्दी देते पण खरं ते त्या लांडोरीला आकर्षित करण्यासाठी असते.

ज्या मोराच्या पिसाऱ्याला निसर्गाने एवढी मनमोहकता बहाल केली आहे, तो पिसारा अनेक मोरपिसांचा बनलेला. त्यातील प्रत्येक मोरपीस इतकं मोहक आहे की त्यामुळेच त्या मोरपिसाऱ्याला आणि पर्यायाने त्या मोराला इतकं आकर्षक रूप बहाल झालंय.

अशी एकही व्यक्ती नसेल ज्याला मोरपीस आवडत नाही. पक्षांची अनेकरंगी आणि अनेक आकारांची पिसं असतात पण मोरपीसाची तुलना कोणाशी होऊ शकत नाही. मोरपीस कधी निरखून बघितले तर,

एका पांढऱ्या देठापासून सुरू होऊन त्याला लहान, नाजूक तंतू असतात, त्याचा रंग तांबडा तपकिरी पण त्याला कमालीची चकाकी असते. ते चकाकणारे तांबूस तपकिरी तंतू पुढे पसरत जातात. त्याची symmetry, सममिती आणि प्रमाणबद्धता इतकी सुंदर की जणू mirror image शोभावी. मोरपिसाला डोळा असतो, त्या डोळ्यांमुळे मोरपीस जास्त आकर्षक आणि मनमोहक दिसते. पांढऱ्या देठापासून सुरू होणार तांबूस तपकिरी मोरपीसाचे तंतू पुढे हिरवे होत जातात, त्यामुळे जसजसे आपण मोरपिसाच्या डोळ्यांकडे येतो तिथे हे तंतू हिरवे आणि तांबूस विटकरी असतात. मोरपिसाच्या डोळ्याचा मधला भाग गर्द निळा, थोडा बदामी आकाराचा. त्याच्या बाहेरील भाग हा हिरवा आणि निळा रंग ह्याचे मिश्रण जणू.  त्याच रंगाला 'मोरपंखी' रंग ही नवीन रंगाची ओळख प्राप्त झाली. तो निळा आणि हिरवा आकर्षक मोरपंखी रंग हे मोरपिसाचं खरं सौंदर्य आणि त्या मोरपिसाची विशिष्ट ओळख आहे. त्याच्या बाहेर पुन्हा तांबूस तपकिरी रंगाचे वलय. त्याच्या सभोवताली पुन्हा हिरव्या आणि तांबूस तपकिरी रंगांच्या तंतूंची सममिती आणि आकर्षक, प्रमाणबद्ध मांडणी. हेच हिरवे आणि तांबूस तपकिरी तंतू, पुढे मोरपिसाच्या डोळ्याभोवती, फेर धरत जणू, पुन्हा एकत्र होत, त्या डोळ्याच्या वर एकवटतात, जणू त्या मोरपिसाला 'मुकुट' बहाल करतात.

इतकं सुंदर मोरपीस, त्याला स्पर्श केला की त्याच्या मखमली स्पर्शाची जाणीव होते. मोरपीसाचा स्पर्श झाला तरी तरी सुखद स्पर्शाची जाणीव होते. मोरपीसाचं आपलं नातं, बालपणीच जुळतं. एखादा मित्र किंवा मैत्रीण कधीतरी आपल्याला ते मोरपीस देतात किंवा कुठे जत्रेत आपल्याला ते मिळतं. ते एक मोरपीस लहान मुलं किती काळ जपून ठेवतात. लहानपणी एक भाबडा समज होता, मोरपीस पुस्तकात ठेवलं की अभ्यास लक्षात राहतो त्या भाबड्या समजुतीमुळे कितीतरी मुलांनी आपल्या पाठ्यपुस्तकात ही मोरपीसं जपून ठेवली असतील.

मोरपीस ही अशी वस्तू आहे जे कुजत नाही, खराब होत नाही. त्याचे आकर्षक रंग, त्याची लकाकी, चमक कायम राहते. निसर्गाने त्या मोरपिसाला जणू 'अमरत्व' बहाल केले आहे. मोरपीस हे फक्त आकर्षकपणामुळे लोकप्रिय नाहीत तर त्याला काही भावनिक आधार आहेत. मोरपीस हे जणू रम्य आठवणींची कुपी असते. बालवयात ज्या मित्र, मैत्रीण वा आपल्या आप्तजनांनी आपल्याला हे मोरपीस भेट दिलेले असते त्याच्या स्मृती आणि आठवण ह्याची दरवळ त्या आठवणींच्या कुपीत साठवण केलेली असते.

मोर ही विद्येची देवता, सरस्वती देवींचे वाहन. त्यामुळे मोर आणि विद्येचा नजीकचा संबंध. जुन्या काळी लोक मोरपिसांचा लेखणीसारखा उपयोग करत. आद्य साहित्यिक कालिदास, मोरोपंत ह्यांच्या साहित्य कलाकृतीच्या दर्शनी मोरपीस हे त्यांच्या लेखणीचे द्योतक मानले जाते.

मोरपीस हे वासुदेवाच्या टोपीवर शोभून दिसते. भल्या पहाटे ह्या वासुदेवाची स्वारी येते, त्यावेळी त्याच्या डोक्यावरील टोपात चहूबाजुनी बाहेर येणारे मोरपीस त्याला वेगळीच शोभा देतात.

मुसलमान फकीर तोच मोरपिसांचा पंखा घेऊन येतो त्यावेळी त्याच्या हातातील भांड्यातील धुपाचा वास आणि तो मोरपिसांचा पंखा डोक्यावर ठेऊन आपले शुभ चिंतीत असतो त्यावेळी त्या मोरपिसाच्या स्पर्शाने मन भारावून जातं.

जैन मुनी ह्या मोरपिसांचा पंखा, ज्याला 'पिच्छि' म्हणतात, त्याचा वापर धर्मगुरूंची बसण्याची जागा साफ करण्यासाठी वापरतात. त्या मोरपिसात इतकी नाजूकता आणि मखमली स्पर्श असतो की ती पवित्र जागा साफ करताना साध्या कीटकांनाही इजा होत नाही.

बौद्ध धर्मातही मोरपिसाला खूप महत्व आहे, मोरपीस हे खुलेपणाचे आणि खुल्या विचारांचे प्रतिक मानतात.

वास्तुशास्त्रात मोरपीसाला खूप महत्व आहे असं मानतात. मोरपीस हे समृद्धी, ऐश्वर्य आणि प्रेमाचं प्रतिक आहे. घरात मोरपीस आकर्षकता निर्माण करते.

मोरपीस आणि पैठणी ह्यांचं अतूट नातं. मोर आणि मोरपीस हा पैठणीच्या जरतारीवरील अविभाज्य घटक. गीतकार सहजपणे लिहितो की, 'पदारावरती जरतारीचा मोर नाचरा हवा'.

मोर हा भारताचा राष्ट्रीय पक्षी, मोरपीस हे त्याच्या अस्तित्त्वाचं प्रतिक जणू. राजस्थानात कैक राजेराजवड्यांचे महाल आहेत ज्यांना, मोर आणि मोरपीस ह्यांच्या नक्षीकाम आणि रंगसंगतीमुळे आकर्षकता आणि सौंदर्य प्राप्त झाले आहे. मैसूरच्या राजवाड्याच्या स्थापत्यकलेत मोर आणि मोरपिसांचे अस्तित्व अधोरखीत होते. मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या स्थापत्य कलेचा मोरपीस वा मयुरपंख हा मूळ गाभा आहे.

मोरपीस आणि कृष्ण, कान्हा ह्याचं नजीकच नातं. मोरपीस दिसलं की सर्वप्रथम श्रीकृष्णाची आठवण येते. कृष्णाच्या शिरपेचात खोचलेलं ते मोरपीस, त्याच्या मुकुटाचा भागच जणू. नुसतं मोरपीस बघितलं तरी प्रथम तो कान्हा, कृष्ण डोळ्यापुढे येतो. कृष्ण आणि मोरपिसाच्या अनोख्या नात्याविषयी एक पौराणिक कथा आहे. गोकुळात एक मोर वास्तव्यास होता, तो कृष्णाचा अनन्य भक्त होता. त्याने कृष्णजप सुरू केला तरी कृष्ण प्रसन्न झाला नाही त्यामुळे त्याला अतीव दुःख झाले, त्यावेळी मोराला कोणीतरी सांगितले तू राधेचा धावा कर त्यामुळे भगवान प्रसन्न होतील. त्या

मोराने बरसाना येथे राधेचा जप केला आणि खरंच कृष्ण प्रसन्न झाले. त्याची भक्ती बघून भगवान श्रीकृष्णाने सांगितले तुझे मोरपीस ह्यापुढे सदैव माझ्या मुकुटात असेल, जणू तो मुकुटाचा भाग बनेल. त्यादिवसापासून मोरपीस ही त्या श्रीकृष्णाची जणू ओळखच झाली. राधा कृष्ण, बासरी आणि मोरपीस ह्याचे अतूट नाते आहे. राधा श्रीकृष्णाच्या अध्यात्मिक प्रेमाबद्दल म्हणते,

"स्पर्श तेरे शब्दों का
रुह को मेहेकाता है ।
स्पर्श तेरे बांसुरी का
मंत्रमुग्ध कर देता है ।
स्पर्श तेरे रंग का कान्हा
मुझे कृष्णमयी कर देता है ।
इस 'मोरपीस' के स्पर्श में
मानो तेरा सहवास दिलाता है।"

मोरपीस आणि श्रीकृष्ण ह्यांचं भावनिक नातं आहे तरीही मोरपीस हे कृष्णाच्या व्यक्तिमत्वाचं प्रतिक वाटतं.

मोरपीसात बाहेरील हिरव्या आणि मग तांबूस तपकिरी रंगापासून आत हिरवा, निळा हिरवा म्हणजे 'मोरपंखी' रंग आणि आत गर्द निळा रंग असतो. गर्द निळा रंग जणू गूढपणा दर्शवतो. श्रीकृष्ण समजायला तसे कठीण, त्या भगवंताला ओळखणे म्हणजे त्याच्या मनाच्या गाभाऱ्यात प्रवेश करण्यासारखे.

तो कान्हा मनमोहक मोरपिसासारखा, आकर्षक. सदैव सतेज व्यक्तिमत त्या मोरपिसासारखे. त्या कृष्णांनी विविध लीला केल्यात आणि समृद्ध आयुष्य जगलंय, त्याचं तजेलपण त्या मोरपिसासारखंच. त्या कृष्णाची समृद्धता जणू त्या मोरपिसाशी साम्य दर्शवते. पावसाळ्यात गर्द निळे ढग जमा होतात, तो सावळा रंग जणू कृष्णाचे प्रतिक, त्याच पावसाच्या आगमनाच्या आनंदात हा मोर जणू, पिसारा फुलवून नृत्य सादर करतो.

मोरपीस आणि पिंपळपान हे आठवणींचे प्रतिक आहेत जणू. आपल्या प्रिय व्यक्तीने अथवा आप्तजनांनी दिलेलं मोरपीस आणि पिंपळाचे पान वहीत अथवा पुस्तकात जपून ठेवलं जातं. त्या पिंपळपानाला कालानुरूप जाळी येते, गत आठवणींची द्योतक जणू पण हे मोरपीस तसंच ताजंतवानं आणि तजेलवान राहतं, त्या गतकाळातील रम्य आठवणींसारखं.

'हेच मोरपीस लहानपणी दिलेलं..
आपण निघून गेलात आयुष्यातून

पण मोरपीस नाही बदललं...
तेच मोरपीस न्याहाळताना
त्या गतस्मृतीला मिळे जणू उजाळा...
आठवणींच्या त्या गोंडाळ्याला जणू मोरपिसांचा दाखला...'

**- मनोज कुरुंभटी**